**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १४५/२०२१ मधील नि. ५ वरील आदेश**

**ज्योती वि. महेश हजारे**

CNR NO.MHSN070012222021

प्रस्तुतचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये उत्तरवादी पासुन दरमहा रक्कम रुपये दहा हजार अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार व उत्तरवादी यांचा साखरपुडा दि. १८.१२.२०१८ रोजी मळणगांव, ता. कवठेमहांकाळ येथे अर्जदाराच्या घरी झाला. त्यावेळी अर्जदाराचे आईवडीलांनी उत्तरवादी यास अर्धा तोळयाची अंगठी, दोन तोळयाची चेन घातली होती. अर्जदार व उत्तरवादी यांचा विवाह दि. २८.०४.२०१९ रोजी मायाक्का चिंचली येथे हिंदू धर्म शास्त्रानुसार झाला. सदर विवाहाचा सपूर्ण खर्च अर्जदाराच्या आईवडीलांनी केला. विवाहामध्ये अर्जदाराच्या आईवडीलांनी त्यांची आर्थीक परिस्थीती नाजूक असताना देखील सर्व वस्तू उत्तरवादींना दिल्या व चांगल्या पध्दतीने विवाह पार पाडला. तसेच त्यांनी लग्नामध्ये उत्तरवादीस एक तोळयाची अंगठी, अर्जदारास मंगळसूत्र,नेकलेस, गंठण व इतर संसारउपयोगी साहित्य दिले.

०३. अर्जदाराने पुढे असे कथन केले की, लग्नानंतर पहिल्या महिन्यापासून उत्तरवादी व त्याचे कुटुंबातील सदस्यांनी अर्जदारासोबत विनाकारण भांडणे करण्यास सुरवात केली. उत्तरवादी हा अर्जदारास 'तुझी माझ्यासोबत घरात राहण्याची लायकी नाही, तुला घरात मोलकरीण म्हणून आणले आहे, घरातील कुत्र्यासारखे मिळेल ते खायचे अन्यथा घरातून निघून जायचे' असे टोमणे देत होता. संसार करण्याच्या उददेशाने अर्जदार उत्तरवादीचा शाररिक व मानसिक त्रास सहन करत राहिली. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, उत्तरवादी हा अर्जदारास सणावाराला, कार्यक्रमास माहेरी पाठवित नव्हता. तसेच तो अर्जदाराला मारहाण करायचा, शिवीगाळ करायचा, जिवे मारण्याची धमकी दयायचा, अर्जदाराच्या आईवडीलास वाईट शब्दांमध्ये शिवीगाळ करायचा. कोरोना टाळेबंदीमध्ये अर्जदारास उत्तरवादी व त्याचे कुटुंबाचे सदस्यांनी घरातील सर्व कामे करायला लावली. परिणामी अर्जदाराच्या पायास दुखापत होवून तिचे चालणे फिरणे बंद झाले. परंतु उत्तरवादीने अर्जदारास औषधोपचार दिले नाहीत. उत्तरवादीने

अर्जदारास वारंवार शिवीगाळी केलेली आहे, टोमणे दिलेले आहेत व घरातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. अर्जदाराचे आईने अर्जदारास फोन केला असता उत्तरवादीचे आईवडीलांनी अर्जदाराच्या हातावर तापविलेल्या उलथण्याने चटके दिले. सदरच्या प्रकारास अर्जदाराच्या नणंदेने देखील प्रवृत्त केले. अर्जदारास झालेल्या शाररिक व मानसिक त्रासामुळे अर्जदारास खाज होवून संपूर्ण शरीरास सूज येवू लागली. त्यामुळे अर्जदारास तिचे आईवडीलांनी दि.०१.०६.२०२१ रोजी माहेरी आणले व तिच्यावर उपचार केले. परंतु उत्तरवादीने अर्जदाराची कधीही विचारपूस केली नाही. तेव्हापासून आजअखेर उत्तरवादीने अर्जदाराची उदरनिर्वाह, औषधपाणी, जेवणखान, निवारा इत्यादीची कोणतीही सोय केलेली नाही. उत्तरवादीने अर्जदाराचा स्वतःहून त्याग केलेला आहे.

०४. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, उत्तरवादीने अर्जदारास नांदावयास नेले नाही. उलटपक्षी मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, रायबाग येथे वैवाहिक हक्क पुर्नस्थापीत होवून मिळण्यासाठी अर्ज केला. अर्जदाराने तिचे विधीज्ञांमार्फत नोटीस पाठवून नांदावयास जाण्याची संमत्ती दर्शविली परंतु उत्तरवादीने उलटटपाली खोटी नोटीस पाठविली. उत्तरवादीने अर्जदारास नांदवून घेण्याचा कोणताही प्रयत्न केलेला नाही.

०५. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तसेच तिचे माहेरच्या कुटुंबातील व्यक्तींना देखील उत्पन्नाचे साधन नाही. उलटपक्षी उत्तरवादी हा अभीयंता असून सौदंती शिवशक्ती साखर कारखाना येथे कायमस्वरुपी नोकरीस आहे. त्यास प्रतिमहिना ३०,०००/- इतका पगार आहे. तसेच उत्तरवादीच्या आईवडीलांना देखील उत्पन्नाचे साधन आहे. उत्तरवादीवर कोणीही अवलंबून नाही. याउलट अर्जदार हिस उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. ती तिच्या आईवडीलांकडे आश्रीताचे जीवन जगत आहे. करिता अर्जदाराने विनंती केली की उत्तरवादीने तिस दरमहा अंतरिम पोटगी रक्कम रुपये १०,०००/- व घरभाडे रक्कम रुपये पाच हजार देण्याचे आदेशीत करण्यात यावे.

०६. उत्तरवादीने त्याचा लेखी जबाब व प्रस्तुतच्या अर्जास उत्तर निशाणी

क्र.१२ अन्वये दाखल दाखल करुन प्रस्तुतच्या अर्जास विरोध दर्शविला आहे. उत्तरवादीने अर्जदाराने कथन केलेली शारिरिक व मानसिक त्रासाबाबतची सर्व कथने नाकारलेली आहेत. अर्जदारासोबतचे नातेसंबंध उत्तरवादीने मान्य केलेले आहेत. उत्तरवादीच्या कथनाप्रमाणे अर्जदाराने दिशाभूल करण्यासाठी व पोटगी मिळविण्यासाठी खोटी कथने केलेली आहेत. उत्तरवादीने कधीही तिच्यावर मानसिक व शाररिक अत्याचार केलेला नाही. त्यामुळे अर्जदाराने पोलीस ठाण्यात कोणतीही तक्रार नोंदविलेली नाही. तसेच उत्तरवादीच्या कोणत्या बहिणीने अर्जदारास मारहाण केली याचा उल्लेख केलेला नाही. यावरुन स्पष्ट होते की उत्तरवादीच्या कुटुंबाविरुध्द खोटे आरोप केलेले आहेत. त्याने पुढे असे कथन केले की न्यायालयाची सहानुभूती मिळविण्याकामी अर्जात खोटी कथने केलेली आहेत. उत्तरवादीच्या कथनाप्रमाणे, अर्जदाराने त्यास त्रास दिल्यामुळे त्याची मानसिक स्थीती ढासळलेली असून तो घरीच असतो. अर्जदार ही उत्तरवादी व त्याचे आईवडीलांसोबत किरकोळ कारणावरुन वाद घालत असे. अर्जदारास कर्नाटक राज्यामध्ये राहणे आवडत नाही. त्यामुळे उत्तरवादी अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे सांगली येथे राहण्यास तयार होते व आहेत. अर्जदार ही तिचे घरी लाडात वाढलेली आहे. अर्जदार ही तिचे लग्नाच्या पूर्वीपासून मनोरुग्ण आहे व त्यावर औषधोपचार चालू आहेत. उत्तरवादीने देखील अर्जदाराच्या मानसिक आजारावर औषधोपचार केलेले आहेत. तसेच त्यांना मुल होण्यासाठी देखील दवाखान्यामध्ये औषधोपचार चालू केलेले आहेत. थोडक्यात, अर्जदारावर कोणताही कौटुंबिक हिंसाचार त्यांनी केलेला नाही. उलटपक्षी त्यांनी अर्जदाराने नांदावयास येण्यासाठी नातेवाईकांमार्फत प्रयत्न केलेले आहेत व न्यायालयामध्ये प्रकरण देखील दाखल केले आहे. परंतु अर्जदार कोणतेही कारण नसताना नांदावयास येण्यास तयार नाही.

०७. उत्तरवादीने कथन केले की, अर्जदाराचे शिक्षण एम.ए झालेले असून तिचे टंकलेखन व शिवणकाम देखील झालेले आहे. अर्जदार खाजगी नोकरी करीत असून त्यापासून तिला दरमहा पंचवीस हजार रुपये पगार मिळतो. अर्जदाराचे वडील सैन्यदलातून निवृत्त झाले असून त्यांना देखील दरमहा सत्तर हजार रुपये निवृत्तीवेतन मिळते. त्यामुळे अर्जदार पोटगी मिळण्यास पात्र नाही. करीता प्रस्तुतचा अर्ज नामंजूर

करण्याची त्यांनी विनंती केली.

०८. अर्ज, अर्जावरील लेखी जबाब व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. दोन्ही पक्षकारांनी सादर केलेल्या कथनांवरुन व युक्तीवादावरुन प्रस्तुतच्या अंतरिम अर्जासाठी खालील विचाराधीन बाबी माझ्या विचारार्थ आल्या आहेत व त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| **अ.क्र.** | **विचाराधीन बाबी** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | उत्तरवादीने अर्जदाराचा स्वतःहून त्याग केल्याचे अर्जदार सकृतदर्शनी सिध्द करते काय ? | होकारार्थी. |
| २ | अर्जदार स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम नसल्याचे व उत्तरवादीस उत्पन्नाचे साधन असल्याचे सिध्द करते काय ? | होकारार्थी. |
| ३ | अर्जदार ही उत्तरवादीकडुन मागणी केल्याप्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी. |
| ४ | आदेश कोणता ? | अंशतः अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**विचाराधीन बाब क्रमांक १ बाबत** –

०९. उत्तरवादीने अर्जदारासोबतचे नाते संबंध मान्य केलेले आहेत. अर्जदाराने कथन केलेली शाररिक व मानसिक त्रासाबाबतची सर्व कथने उत्तरवादीने नाकारलेली आहेत. अर्जदाराच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अर्जातील कथने सकृतदर्शनी उत्तरवादीने अर्जदाराचा त्याग केला हे दाखवण्यासाठी पुरेशी आहेत. अर्जदारास उत्तरवादीने वेळोवेळी शाररिक व मानसिक त्रास दिलेला आहे. तसेच ते आजही अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार करीत आहेत. अर्जदारास उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. उलटपक्षी उत्तरवादी खाजगी नोकरीस असून त्यास चांगला पगार मिळतो.

कायदयाचे स्वरुप बघता अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. अर्जदाराच्या विधीज्ञांनी पुढे असे युक्तीवाद केला की, अर्जदाराच्या कथनावर यावेळी अविश्वास निर्माण करता येणार नाही. प्रथमदर्शनी उत्तरवादीने अर्जदाराचा त्याग केल्याचे व त्यास उत्पन्नाचे साधन असल्याचे सिध्द झालेले आहे. त्यामुळे मागणी केल्याप्रमाणे अर्जदार अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत.

१०. उलटपक्षी उत्तरवादीच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदाराने उत्तरवादीचा स्वतःहुन त्याग केलेला आहे. अर्जामध्ये खोटी व लबाडीची कथने केलेली आहेत. त्यामुळे अर्जदार ही पोटगीस पात्र नाही. अर्जदातील कथने व अर्जदाराचा युक्तीवाद लक्षात घेता असे दिसून येते की, अर्जदाराने केवळ उत्तरवादीकडून पैसे मिळण्यासाठी प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जातील कथनांना पुष्टी देण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. त्यामुळे अर्जातील कथनांवर विश्वास ठेवता येणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची त्यांनी विनंती केली.

११. अर्जाचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, अर्जदार हिने प्रत्येक घटनेचे सविस्तर वर्णन अर्जामध्ये नमुद केलेले आहे. अर्जातील प्रत्येक कथनांचा विचार केला असता अर्जदारास उत्तरवादीने शाररिक व मानसिक त्रास दिल्याचे सकृतदर्शनी सिध्द होते. अर्जामध्ये उत्तरवादीने अर्जदारास वारंवार मारहाण केल्याचे, शिवीगाळ केल्याचे नमूद केलेले आहे. यावरुन असे दिसून येते की, अर्जदारास उत्तरवादीने वेळोवेळी शाररिक व मानसिक त्रास दिलेला आहे. मुळात उत्तरवादीने देखील कथन केले आहे की, अर्जदार ही मानसिक रुग्ण आहे. यावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, उत्तरवादीने अर्जदारास तिचे मानसिक आजाराच्या कारणावरुन तिस टोमणे दिलेले आहेत. सदरच्या कारणावरुन सकृतदर्शनी असे दिसून येत की, उत्तरवादी अर्जदाराचा योग्य रितीने सांभाळ करीत नाही व त्याने अर्जदाराचा स्वतःहून त्याग केलेला आहे. यावेळी अर्जदाराच्या कथनांवर संशय निर्माण होण्यास कोणतेही सबळ कारण अभिलेखावर आलेले नाही. उत्तरवादीच्या कथनांप्रमाणे अर्जदाराने खोटी कथने केलेली आहेत, परंतु ही बाब दोन्ही बाजुंचा पुरावा आल्यानंतरच बघणे उचित होईल. अर्जदारास त्रास दिल्याबाबतची कथने ही घरामध्ये घडली असल्यामुळे त्याबाबत कागदोपत्री पुरावा

असणे अशक्य आहे. प्रस्तुत अर्जामध्ये उत्तरवादीने अर्जदारास शाररिक व मानसिक त्रास दिल्याबाबत पुरेशी कथने आहेत. त्यावरुन सकृतदर्शनी असे दिसून येते की, उत्तरवादीने अर्जदाराचा स्वतःहून त्याग केलेला आहे व अर्जदारास उत्तरवादीने त्रास दिल्यामुळे वेगळे राहणे भाग पडत आहे. उत्तरवादीने अर्जदारास नांदावयास येण्याबाबत नोटीस पाठविली आहे परंतु त्याकरीता कोणतेही ठोस प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. करीता वरील सर्व कारणांवरुन मी या निष्कर्षापर्यंत येतो की, अर्जदाराचा उत्तरवादीने मानसिक व शारिरिक छळ केला व त्याद्वारे अर्जदारास वेगळे राहणे भाग पाडल्याचे व उत्तरवादीने कोणतेही कारण नसताना अर्जदाराचा स्वतःहून त्याग केल्याचे सकृतदर्शनी सिध्द झालेले आहे. करिता विचाराधीन बाब क्र.१ च्या उत्तरार्थ मी होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**विचाराधीन बाब क्र. २ बाबत -**

१२. अर्जदाराने स्पष्टपणे कथन केले आहे की, तिला उत्पन्नाचे साधन नाही. तसेच ती कोठेही कामधंदा करु शकत नाही. तिने दाखल केलेल्या सांपत्तीक स्थितीबाबतचे व त्यांच्या उत्पन्नाबाबतच्या शपथपत्रामध्ये (नि.क्र.०८) मध्ये देखील नमूद केले आहे की तिला उत्पन्नाचे साधन नाही. उत्तरवादीने कथन केले आहे की, अर्जदार खाजगी कंपनीत नोकरी करते परंतु सदर कथनाबाबत प्रथमदर्शनी कोणताही पुरावा नाही. करीता प्रथमदर्शनी सिध्द होते की अर्जदारास उत्पन्नाचे साधन नसून ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे.

१३. उत्तरवादीने त्याचे सांपत्तीक स्थितीबाबतचे व उत्पन्नाबाबतचे शपथपत्र दाखल केलेले नाही. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे उत्तरवादी हा खाजगी कंपनीत नोकरी करीत असून त्यापासून त्यास दरमहा तीस हजार रुपये पगार आहे परंतु त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभीलेखावर दाखल नाही. उत्तरवादीने देखील त्याच्या उत्पन्नाबाबत स्पष्ट कथन केलेले नाही. उत्तरवादी हा धडधाकट शरीरयष्टीचा आहे. त्यामुळे त्यास नक्कीच उत्पन्न मिळत असणार. एकंदरीत उत्तरवादीस उत्पन्नाचे साधन असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते.

१४. अंतरिम पोटगीची रक्कम ठरविताना अर्जदार व उत्तरवादीचे राहणीमान, उत्तरवादीचे उत्पन्न, अर्जदाराच्या गरजा, अर्जदार रहात असलेले ठिकाण इत्यादी बाबी

विचारात घेणे आवश्यक असते. अर्जदारावरती कोणीही अवलंबून नाही. अर्जदार राहण्यास खेडेगावामध्ये आहे. तसेच अर्जदाराच्या इतर विशेष गरजा असल्याबाबत प्रथमदर्शनी अभीलेखावर दिसून येत नाही. अशा परिस्थीतीमध्ये मागणी केयाप्रमाणे पूर्ण पोटगी रक्कमेस अर्जदार पात्र ठरत नाही. तसेच तेवढी अंतरिम पोटगी देण्यासाठी उततरवादीचे तेवढे उत्पन्न नाही. अर्जदार व उत्तरवादीचे राहणीमान, उत्तरवादीचे उत्पन्न, अर्जदाराच्या गरजा, अर्जदार रहात असलेले ठिकाण इत्यादी बाबी विचारात घेतल्या असता मी या निष्कर्षापर्यंत येतो की, अर्जदारास उत्तरवादीने दरमहा रुपये ३,५००/- अंतरिम पोटगी देण्याचे आदेशीत करणे उचित ठरते. करिता मी विचाराधीन बाब क्र. २ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**विचाराधीन बाब क्र. ३**

१५. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे अर्जदार अंशतः अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. वरील सर्व कारणांवरुन अर्ज अंशतः मंजूर करणे उचित ठरते. करीता विचाराधीन बाब क्रमांक ३ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवून विचाराधीन बाब क्र. ४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे-

## आदेश

१. नि.क्र.५ वरील अंतरिम पोटगीचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. उत्तरवादी याने अर्जदार हिला प्रतिमहा रक्कम रुपये ३,५००/- (रुपये तीन हजार पाचशे मात्र) अंतरिम पोटगी म्हणून मुळ अर्जाचा निकाल लागेपावतो अथवा पुढील आदेश होईपावेतो मूळ अर्ज दाखल दिनांकापासुन द्यावी.

३. सदरच्या आदेशाची प्रत अर्जदार व उत्तरवादी यांना निशुल्क देण्यात यावी.

४. प्रस्तुत अर्जाचा खर्च रुपये एक हजार पाचशे रुपये उत्तरवादीने अर्जदारास दयावा.

ARUN RAGHUNATH VYAWAHARE
Digitally signed by ARUN RAGHUNATH VYAWAHARE
Date: 2025.01.20 07:35:24 +0530

दिनांक १८/०१/२०२५. (अरुण र. व्यवहारे )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
कवठेमहांकाळ कवठेमहांकाळ.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date - 18.01.2025
Order signed by the
Presiding Officer on -18.01.2025
Order uploaded on -20.01.2025